# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक- २१ नोव्हेंबर, २००७

## आदेश

क्रमांक- रानिआ/ग्रापनि २००७/ प्र.क्र.१० /का.८ - ज्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के मधील तरतुदींनुसार राज्यातील पंचायतींच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे, आणि

ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या प्रभागात विभाजन करणे आणि जागा राखून ठेवणे) १९६६ मध्ये नियम ५ अंतर्गत पंचायतीच्या एकूण सदस्यांची संख्या, प्रभागांची संख्या, प्रभागांची व्याप्ती, प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांची संख्या आणि ज्या प्रभागात किंवा प्रभागांमध्ये (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नागरीकांचा मागासप्रवर्ग व स्त्रिया यांसाठी) जागा राखून ठेवल्या आहेत असे प्रभाग इत्यादी तपशिल प्रारुप स्वरुपात सदर नियमाच्या सोबतच्या नमुना "ब" मधील अनुसूचीमध्ये प्रसिध्द करणे व प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन नियम ५ (१) अंतर्गत अंतिमरित्या नमुना "अ" मधील अनुसूचीमध्ये प्रसिध्द करणे आवश्यक आहे. याबाबतचा नमुना "अ" व "ब" हे नियमाच्या सोबत दिलेले असून राज्य निवडणूक आयोगाने दि. २५ ऑक्टोबर, १९९४ च्या आदेशान्वये ते योग्य त्या सुधारणांसह स्विकारले आहेत. सदर आदेश दि. ८ डिसेंबर, १९९४ च्या राजपत्रात प्रसिध्द झाले आहे. १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५२ दि. १६/१२/१९९४ अन्वये सुधारीत नमुना "अ" व नमुना "ब" हे नियमात अंतर्भूत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, नियमातील तरतुदीनुसार नमुना "ब" व नमुना "अ" मध्ये प्रारुप प्रभाग रचनेचा तपशिल व आरक्षणाचा तपशिल हे ग्रामपंचायतीच्या पातळीवर तसेच चावडीवर प्रसिध्द करावयाचे असल्याने सदर प्रपत्रात सर्व तपशिल व्यवस्थितपणे व सर्वसामान्यांना समजून येईल अशा प्रकारे देणे आवश्यक आहे. मात्र असे निदर्शनास आले आहे की, सदर प्रपत्रामध्ये सहा रकाने असून तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या रकान्यात अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागासप्रवर्ग यांच्यासाठी आरक्षित जागांची संख्या दर्शविण्याची तरतूद आहे. तसेच रकाना सहामध्ये अ.जा.स्त्री राखीव, अ.ज. स्त्री राखीव, ना.मा.प्र स्त्री राखीव व सर्वसाधारण स्त्रिया तसेच एकूण स्त्रियांचे आरक्षण दर्शविण्याची तरतूद आहे. मात्र सदर प्रपत्रात सर्वसाधारण वर्गवारीतील

(अनारक्षित) जागांची संख्या दर्शविणारा रकाना नाही. त्यामुळे सर्वसाधारण जागांची संख्या स्पष्टपणे समजून येत नाही. ही बाब सर्वसामान्य नागरीकांच्या / मतदारांच्या / संभाव्य उमेदवारांच्या मनात संभ्रम निर्माण करणारी आहे. तसेच त्यामुळे निवडणूक निर्णय अधिका-यांकडून चूक होऊ शकते आणि त्यामुळे सदर नमुना "अ" व "ब" मध्ये केवळ स्पष्टीकरणाच्या दृष्टीने प्रभागनिहाय सर्वसाधारण जागांची संख्या (Number of seats unreserved) असा तपशिल दर्शविणारी टीप समाविष्ट करण्यात यावी असे आदेश देणे आवश्यक झाले आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० अ च्या पोटकलम ४ मध्ये, या अधिनियम व नियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आयोगाला न्याय्य व मुक्त निवडणूक होण्याच्यादृष्टीने या अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश काढता येतील अशी तरतूद आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १० अ अन्वये यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, असा आदेश देत आहे की, ग्रामपंचायत निवडणुकीकरीता प्रभाग रचना आरक्षण इ. तपशिल दर्शविण्याकरिता मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या प्रभागात विभाजन करणे आणि जागा राखून ठेवणे) नियम १९६६ च्या नियम ५ (१) व ५ (२) अंतर्गत अधिसूचना प्रसिध्द करतांना सदर नमुना "अ" व "ब" खाली प्रभागनिहाय सर्वसाधारण जागांची संख्या (Number of seats unreserved) असा तपशिल दर्शविणारी टीप समाविष्ट करण्यात यावी आणि या आदेशासोबतच्या परिशिष्ट १ व २ मध्ये दिल्याप्रमाणे नमुना "अ" व "ब" प्रसिध्द करण्यात यावेत

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

F:\VillagePanchayats\new perform A & B.doc/acgp

परिशिष्ट १

## नमुना अ

(नियम ५ (१) पहा)

### अधिसूचना

क्रमांक-------- मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) १९६६ याच्या नियम ५ (१) अनुसार मी -------------------राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी याद्वारे असे अधिसूचित करतो की,

(अ) ------------- ग्रामपंचायतीत ---------------सदस्यांचा समावेश राहील;

(ब) ------------- गावाचे ------------ प्रभागांमध्ये विभाजन करण्यात येईल;

(क) यासोबत असलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांची संख्या ही स्तंभ १ मध्ये अशा संख्येसमोर विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकी राहील;

(ड) अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्रभाग हे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३), (४), (५), व (६) यामध्ये दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग, व स्त्रिया यांच्यासाठी ज्या प्रभागांतून जागा राखून ठेवण्यात येतील असे प्रभाग असतील. अनुसूचीच्या खालील टीपेमध्ये त्या प्रभागात असलेल्या अनारक्षित / सर्वसाधारण जागांचा तपशिल दर्शविला आहे.

## अनुसूची

| प्रभागांची संख्या व विस्तार | निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या | अनुसूचित जातींसाठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गाकरिता राखून ठेवलेल्या जागांची संख्या | स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ.जा. मधील (अ) | अ.ज. मधील (ब) | ना.मा.प्र. मधील (क) | सर्वसाधारण मधील (ड) | एकूण (अ + ब + क + ड) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | | | |
| | | | | | | | | | |

टीप : वरील रकाना क्रमांक ३,४ व ५ नुसार जागा आरक्षित ठेवल्यानंतर एकूण ........ जागा अनारक्षित (unreserved)राहतील. त्यापुढीलप्रमाणे :

: प्रभाग क्र.१मध्ये ........जागा अनारक्षित (unreserved)राहतील.

: प्रभाग क्र.२मध्ये ........जागा अनारक्षित (unreserved)राहतील.

: प्रभाग क्र.३मध्ये ........जागा अनारक्षित (unreserved)राहतील.

याप्रमाणे प्रभाग ६ पर्यंत

राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी )

परिशिष्ट २

## नमुना ब

(नियम ५ (२) पहा)

**नोटीस**

मी, ---------------, राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागांत विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ याच्या नियम ५(२) अनुसार काढल्याचे योजलेल्या अधिसूचनेचा पुढील मसुदा तिच्यामुळे बाधित होणाऱ्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे व याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा -------- नंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त अधिसूचनेच्या मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ----------पूर्वी कोणतेही आक्षेप किंवा सूचना माझ्याकडे आल्यास मी त्या विचारात घेईन.

**अधिसूचना**

क्रमांक-------- मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) १९६६ याच्या नियम ५ (१) अनुसार मी -------------------राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी याद्वारे असे अधिसूचित करतो की,

(अ) ------------- ग्रामपंचायतीत ---------------सदस्यांचा समावेश राहील;

(ब) ------------- गावाचे ------------ प्रभागांमध्ये विभाजन करण्यात येईल;

(क) यासोबत असलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांची संख्या ही स्तंभ १ मध्ये अशा संख्येसमोर विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकी राहील;

(ड) अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्रभाग हे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३), (४), (५), व (६) यामध्ये दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग, व स्त्रिया यांच्यासाठी ज्या प्रभागांतून जागा राखून ठेवण्यात येतील असे प्रभाग असतील. अनुसूचीच्या खालील टीपेमध्ये त्या प्रभागात असलेल्या अनारक्षित / सर्वसाधारण जागांचा तपशिल दर्शविला आहे.